आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२७ नोव्हेंबर २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- स्कायरूट या भारतीय अंतराळ स्टार्टअपच्या इन्फिनिटी कॅम्पसचं प्रधानमंत्र्यांकडून दूरस्थ पद्धतीने उद्घाटन

- शेतीशी निगडीत कर्जवसुलीला एक वर्षाची स्थगिती देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ६ पूर्णांक ६ दशांश टक्क्यानी वाढण्याचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज

- युनेस्कोच्या मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण

**आणि**

- उच्चांकी पातळीला स्पर्श केल्यानंतर शेअर बाजारात नफेखोरी

<><><><><>

भारताच्या अंतराळ संशोधन क्षेत्रात सरकारने अनेक सुधारणा केल्या असून जगातले गुंतवणूदार याकडे आकर्षित होत आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. स्कायरूट या भारतीय अंतराळ स्टार्टअपच्या इन्फिनिटी कॅम्पसचं उद्घाटन आज प्रधानमंत्र्यांनी दूरस्थ पद्धतीने केलं, त्यावेळी ते बोलत होते. अंतराळ संशोधन क्षेत्र खासगी नवोन्मेषासाठी खुलं करण्यात आल्यामुळे स्टार्टअप आणि उद्योगांना देशाच्या वैज्ञानिक परिसंस्थेत काम करणं सुलभ झालं, येणाऱ्या काळात जागतिक अंतराळ क्षेत्र अर्थव्यवस्था झपाट्याने वाढणार असून देशातल्या युवावर्गाच्या रोजगार संधी कैकपटीने वाढणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

भारताच्या अंतराळ संशोधन क्षेत्राच्या भवितव्याला ३०० पेक्षा जास्त स्टार्टअप्स आकार देत आहेत, स्कायरूट इन्फिनीटी कॅम्पस हे देशाच्या नवा विचार, नवोन्मेष आणि युवा शक्तीचं प्रतीक आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड - बाईट -मोदी**

इस्त्रोने भारताच्या अंतराळ क्षेत्राला नव्या उंचीवर नेऊन ठेवलं असून विश्वासार्हता, क्षमता आणि मूल्यं यांच्या जोरावर भारतानं जागतिक अंतराळ संशोधन क्षेत्रात नवी ओळख निर्माण केली आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

देशाची सैन्यदलं अतिशय देशभक्तीने तसंच कार्यक्षमतेने देशाच्या सार्वभौमत्वाचं रक्षण करण्यासाठी सज्ज असतात, अशा शब्दांत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सैन्यदलांची प्रशंसा केली आहे. नवी दिल्लीत आयोजित चाणक्य संरक्षण संवाद २०२५ मध्ये त्या आज बोलत होत्या. नुकत्याच झालेल्या ऑपरेशन सिंदूरच्या यशामध्ये देशाच्या दहशतवादविरोधी आणि प्रतिबंधात्मक क्षमतेचा परिचय मिळाला असून भारतीय सैन्यदलांनी ज्या कार्यक्षमतेनं आणि नैतिक जाणीव ठेवून लष्करी क्षमता वापरली त्याची जगभरात  नोंद घेतली गेली आहे, असं त्यांनी सांगितलं.

राष्ट्रपती आजपासून ओदिशाच्या दौऱ्यावर असून आज संध्याकाळी त्या ओदिशा विधानसभेच्या हिवाळी सत्राला संबोधित करतील. राष्ट्रपती पदभार स्वीकारल्यापासून प्रथमच ओदिशाच्या विधानसभेला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

महायुतीतल्या तिन्ही पक्षांमध्ये निधी देण्यावरून चढाओढ लागली आहे, असा आरोप ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज केला. बारामती इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. हल्ली कामावर मतं मागितली जात नाहीत, तर पैसे देऊन, निधी देऊ अशी आश्वासनं दिली जातात. ही चांगली गोष्ट नाही. अर्थकारण आणून निवडणुका

जिंकायच्या, हाच दृष्टिकोन असेल, तर त्यावर भाष्य न केलेलं बरं, असं पवार म्हणाले. राज्य सरकारनं कर्जवसुलीला एका वर्षाची स्थगिती देण्याचा निर्णय तात्पुरता उपयोगी ठरेल, पण शेतकऱ्यांचं झालेलं आर्थिक नुकसान पाहता त्यातली काही रक्कम सरकारनं द्यायला हवी होती, असं मतही पवार यांनी मांडलं.

<><><><><>

महाराष्ट्रात यंदा जून ते सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पुढच्या एक वर्षासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच सर्व बाधित तालुक्यांच्या सर्व गावातील बाधित शेतकऱ्यांच्या अल्पमुदत कर्जाचं मध्यम मुदत कर्जात रुपांतरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सहकार विभागाने यासंदर्भातील परिपत्रक जारी केलं आहे. राज्य सरकारने ऑक्टोबर महिन्यात ३२ हजार कोटींचा विशेष मदतनिधी जाहीर केला होता; त्याचवेळी दुष्काळी उपाययोजना, सवलती लागू करण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर कर्ज पुनर्गठन आणि वर्षभरासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली आहे. राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई त्याचप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. तसंच सहकार आयुक्तांनी परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल याची दक्षता घ्यावी, असंही परिपत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

<><><><><>

गौण खनिजांची वाहतूक करताना सापडलेल्या वाहनांचा परवाना थेट निलंबित किंवा रद्द करण्याची धडक कारवाई आता करण्यात येणार आहे. राज्यातील वाळू आणि इतर गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतूक

रोखण्यासाठी महसूल विभागानं हा निर्णय घेतल्याचं काल जारी केलेल्या परिपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ६ पूर्णांक ६ दशांश टक्क्यानी वाढण्याचा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केला आहे. जीएसटी सुधारणांमुळे अमेरिकेने लादलेल्या आयात कराच्या प्रतिकूल परिणामापासून देशाची अर्थव्यवस्था वाचण्याची शक्यता आहे, असंही यात नमूद करण्यात आलं आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सकल राष्ट्रीय उत्पादन ७ पूर्णांक ८ दशांश टक्के इतकं होतं. तसंच मागील आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेची वाढ ६ पूर्णांक ५ दशांश टक्के नोंदवण्यात आली होती. या वर्षात त्यात वाढ होण्याचा अंदाज असल्यानं भारतीय अर्थव्यवस्था सातत्यानं वाढ करत असल्याचं नाणेनिधीनं म्हटलं आहे. व्यापक संरचनात्मक सुधारणा करून भारताच्या अर्थव्यवस्थेत प्रगती साधली जाऊ शकते, असंही या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पॅरिस इथल्या युनेस्कोच्या मुख्यालयात काल संविधान दिनानिमित्तानं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या त्यांच्या पोस्टमध्ये अभिमान व्यक्त केला आहे. भारतीय राज्यघटना तयार करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला दिलेली ही आदरांजली आहे, असं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आणि संकल्पनांनी अगणित लोकांच्या जीवनात शक्ती आणि आशा निर्माण केल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी पातळीला स्पर्श केला मात्र त्यानंतर नफेखोरी झाल्यानं दोन्ही निर्देशांक घसरले. सकाळी व्यवहार सुरू झाले तेव्हापासूनच बाजारात तेजी होती. व्यवहाराच्या दरम्यान सेन्सेक्सनं ४४६ अंकांची तेजी नोंदवून ८६ हजार ५६ च्या विक्रमी पातळीला स्पर्श केला होता. निफ्टीनं १०५ अंकांच्या वाढीसह २६ हजार ३१० अंकांची विक्रमी पातळी गाठली होती. त्यानंतर नफा वसुली सुरू झाल्यानं दोन्ही निर्देशांकात घसरण दिसून आली. उच्चांकी पातळीवरुन सेन्सेक्स सुमारे पावणे सहाशे आणि निफ्टी सुमारे दीडशे अंक खाली आला आणि दोन्ही निर्देशांकात घसरणीसह व्यवहार सुरू होते. सध्या पुन्हा दोन्ही निर्देशांकात थोडीफार घसरण दिसत आहे.

<><><><><>

गोव्यात सुरू असलेल्या ५६व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आजही जगभरातले विविध चित्रपट दाखवले जात आहेत. ‘ऑरेंडा’, ‘कॉटन क्वीन’, ‘अ पोएट’, ‘स्लीपलेस सिटी’, ‘द वुमन’ या चित्रपटांचा यात समावेश आहे. विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये गाजलेला आणि इफ्फीमध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पणाच्या शर्यतीत असलेला ‘फ्यूरी’ हा चित्रपट आज दाखवण्यात आला. याशिवाय, अभिनेता आमिर खानचा मास्टरक्लास तसंच शोले चित्रपटाला ५० वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं रमेश सिप्पी आणि किरण सिप्पी यांचंही सत्र आज होणार आहे. त्याचप्रमाणे नागार्जुन आणि सी. व्ही. राव हेही आपले विचार मांडणार आहेत. यंदा इफ्फीमध्ये ‘प्यासा’, ‘गमन’, ‘उमराव जान’, ‘डॉक्टर कोटणीस की अमर कहानी’ असे क्लासिक चित्रपट दाखवले जात आहेत. दरम्यान, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आज विख्यात चित्रकर्मी के. वैकुंठ यांच्या स्मरणार्थ एका विशेष टपाल तिकिटाचं प्रकाशन केलं. १९७७ मध्ये प्रदर्शित झालेल्या के. वैकुंठ यांचा ‘गोवा मार्चेस ऑन’ हा माहितीपटही यावेळी दाखवण्यात आला.

<><><><><>

धुळे जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींना स्व संरक्षणाचे धडे देण्यासाठी आजपासून धुळ्यात विशेष विरागंना प्रशिक्षण शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. यात सर्व माध्यमांच्या शाळा आणि महाविद्यालयातील १० हजारहून अधिक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.

//<><><><><>//